जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - १२८ दिनांक - २१/०२/२०२४

### गुन्हे शाखा, पुणे शहर

### समर्थ पो.स्टे.पुणे शहर गु.रजि.नं.३८/२०२४ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२२(क),२९ या गुन्ह्यामध्ये मॅफेड्रॉन (एमडी) जप्त केलेबाबत.

| | | |
|---|---|---|
| १. | पोलीस ठाणे | समर्थ पो स्टे पुणे शहर |
| २. | गु.र.नं. | ३८/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २२(क),२९ |
| ३. | फिर्यादी | विठ्ठल वसंतराव साळुंखे,वय - ४७ वर्षे, पो. हवा. १४००, गुन्हे शाखा, युनिट-१, पुणे. |
| ४. | अटक आरोपी | १. वैभव उर्फ पिंटया भारत माने वय ४० रा.सोमवार पेठ, ,पुणे<br>२. अजय आमरनाथ करोसिया वय ३५ वर्ष रा.भवानीपेठ, पुणे<br>३. हैदर नुर शेख, वय ४० वर्ष रा. विश्रांतवाडी,पुणे.<br>४. भिमाजी परशुराम साबळे वय ४६ वर्षे रा.पुणे<br>५. युवराज बब्रुवान भुजबळ वय-४१ वर्षे रा.डोबिंवली वेस्ट, मुंबई<br>६. दिवेश चिरंजीत भुटिया रा.नवी दिल्ली<br>७. संदिप राजपाल कुमार रा.नवी दिल्ली<br>८. संदिप हनुमानसिंग यादव रा.नवी दिल्ली |
| ५. | अपराध घडला ता.वेळ व ठिकाण | दि.१९/०२/२०२४ रोजी ०२/०० वा.चे सुमारास महापालीका सहाय्यक आयुक्त कार्यालय, विश्रामबाग वाडा, पुणे महानगर पालीका प्रभाग-१६ सोमवार पेठ, खडीचे मैदान आरोग्य कोठी समोर सार्वजनिक रोडवर |
| ६. | गुन्हा दाखल ता.वेळ | दि.१९/०२/२०२४ रोजी १०/४५ वा. |
| ७. | मिळाला माल | १६८८ किलो मॅफेड्रॉन (एमडी)अंदाजे किंमत ३२७६ कोटी रुपये व इतर साहित्य |

गुन्हयाची थोडक्यात हकिकत - दिनांक १९/०२/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट-१ कडील पोलीस अंमलदार विठ्ठल सांळुखे यास मिळालेल्या बातमीवरुन खडीचे मैदान आरोग्य कोठी समोर, सोमवार पेठ, पुणे येथुन पांढरे रंगाची इर्टीगा कार नं. एम एच. १२ यु.जे. ४०८१ मधील रेकॉर्डवरील आरोपी नामे वैभव उर्फ पिंटया भारत माने वय-४० वर्षे रा. खडीचे मैदान सोमवार पेठ, पुणे व त्याचा साथीदार नामे अजय अमरनाथ करोसिया वय ३५ वर्ष रा. पुणे यांना ताब्यात घेवुन त्यांना पोलीसी खाक्या दाखवुन तपास करुन त्यांचेकडुन अंदाजे १ कोटी रुपयांचे ५०० ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. त्यांचेकडे केलेल्या तपासामध्ये हैदर नुर शेख रा. विश्रांतवाडी, पुणे यांचेकडुन अंदाजे २ कोटी ५० लाख रुपयांचे १ किलो २५० ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.) जप्त करण्यात आले होते. असा एकुण नमुद आरोपींकडुन ३,५८,२८,४००/- रुपयांचा अंमली पदार्थ व इतर साहित्य जप्त करण्यात आले होते. सदरबाबत बेकायदेशीररित्या मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगला तसेच साठवणुक केली म्हणुन वर नमुद तिन्ही आरोपी विरोधात समर्थ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३८/२०२४ एनडीपीएस ॲक्ट ८(क), २२(क), २९ अन्वये गुन्हा नोंद करणेत आला होता.

नमुद आरोपींना मा. न्यायालयात हजर केले असता त्यांना दिनांक २४/०२/२०२४ रोजीपर्यंत पोलीस कस्टडी मंजुर केली आहे. त्या अनुषंगाने अटक आरोपी नामे हैदर नुर शेख रा.विश्रांतवाडी, पुणे याचेकडे केलेल्या तपासामध्ये त्याचेकडुन मिळालेल्या माहितीवरुन पुणे शहरामध्ये विक्रीसाठी आणलेला मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ त्याने लेन नं.२ ए,भैरवनगर, धानोरी रोड, विश्रांतवाडी, पुणे येथील गोडावुन मध्ये साठवणुक करुन ठेवल्याचे सांगितल्याने सदर ठिकाणी गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी छापा टाकला असता त्या ठिकाणी गोडावुनमध्ये वेगवेगळया मिठाच्या पोत्यामध्ये ठेवलेला अंदाजे किमंत १०५ कोटी रूपयांचा ५२ किलो ५२० ग्रॅम मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने तो जप्त केला होता.

गुन्ह्याची व्याप्ती लक्षात घेवुन अटक आरोपी नामे हैदर नुर शेख रा.विश्रांतवाडी, पुणे याचकडे अधिकचा तपास करता त्याने गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ इसम नामे भिमाजी परशुराम साबळे रा. पिंपळे सौदागर, पुणे यांचे मालकीचे अर्थ केम लॅबोरेटरी, कुरकुंभ ता.दौंड जि.पुणे येथे इसम नामे युवराज बब्रुवान भुजबळ रा. मुंबई याचे सांगणेवरुन व त्याने पुरविलेल्या कच्चा मालातुन मॅफेड्रॉन (एम.डी.) तयार केले जात होते. सदर फॅक्टरी मध्ये दि.२०/०२/२०२४ रोजी पहाटेच्या सुमारास गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केलेल्या अचानक छापा कारवाई मध्ये वेगवेगळया ड्रम्समध्ये ठेवलेले सुमारे ६६३ किलो ८०० ग्रॅम मॅफेड्रॉन (एम.डी.) अंदाजे किमंत १३२७,६०,००,०००/-रुपयांचे जप्त करण्यात आलेले आहे. कुरकुंभ एमआयडीसी मध्ये तयार होणारे मॅफेड्रॉन एमडी हे युवराज भुजबळ याचे सांगणेवरुन त्याचा साथीदारांचे मदतीने पुणे शहर, दिल्ली व इतर वेगवेगळया ठिकाणी वितरीत करण्यात येत होते. आज रोजी युवराज बब्रुवान भुजबळ वय- ४१ वर्षे रा. मुंबई यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे तसेच सदरची फॅक्टरी चालविणारे फॅक्टरीचे मालक भिमाजी परशुराम साबळे वय-४६ वर्षे रा. पुणे यांना देखील सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. सदरची फॅक्टरी अर्थ केम लॅबोरेटरी या नावाने चालु होती ती आज रोजी एमआयडीसी कुरकुंभ येथील अधिका-यांच्या मदतीने सील करण्यात आलेली आहे.

सदर फॅक्टरीमध्ये तयार होणारे मॅफेड्रॉन (एम.डी.) हे दिल्ली या ठिकाणी मोठया प्रमाणात पाठविल्याचे अटक आरोपींकडे केलेल्या तपासामध्ये निष्पन्न झाल्याने सदर ठिकाणी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, शब्बीर सय्यद, अजय वाघमारे व इतर अधिकारी व स्टाफ यांना पाठविण्यात आले होते. त्यांनी दिल्ली येथे जावुन छापा कारवाई मध्ये १)जगराम मंदिराजवळील, कटोला मुबारक साऊथ एक्सटेंन्शन पार्ट १ येथुन एकुण ३१९ किलो मॅफेड्रॉन (एम.डी.) व २) मस्जिद मोड ३२३, साऊथ एक्सटेंन्शन पार्ट २ या ठिकाणावरून ६५१ किलो मॅफेड्रॉन (एम.डी.) असे एकुण ९७० किलो मॅफेड्रॉन (एम.डी.) जप्त करण्यात आले असुन त्याची अंदाजे किंमत १९४० कोटी रूपये आहे. सदर कारवाईमध्ये १) दिवेश चिरंजीत भुटिया, रा.नवी दिल्ली २) संदिप राजपाल कुमार रा.नवी दिल्ली ३) संदिप हनुमानसिंग यादव रा.नवी दिल्ली यांना अटक करण्यात आली आहे.

तसेच अटक आरोपींकडे केलेले तपासामध्ये कुरकुंभ एम.आय.डी.सी. येथील फॅक्टरीमधुन तयार होणारे मॅफेड्रॉन (एम.डी.) हे कुपवाड जि.सांगली या ठिकाणी पाठविल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर ठिकाणी गुन्हे शाखेची ३ पथके पाठविण्यात आली होती. सदर ठिकाणी देखील (एम.डी.) मॅफेड्रॉनचा मोठया प्रमाणात साठा सापडला असुन तेथे छापा कारवाई सुरू आहे. सांगलीसाठी मदतीकरीता गुन्हे शाखेची आणखी २ पथके रवाना केलेली आहेत. कारवाई करण्यात आलेल्या ठिकाणावरून इसम नामे आयुब अकबरशहा मकानदार वय ४४ वर्षे रा.कुपवाडा सांगली याला ताब्यात घेण्यात आले असुन मॅफेड्रॉन (एम.डी.) जप्ती कारवाई चालु आहे.

अशा प्रकारे दाखल गुन्ह्यामध्ये आजपावेतो केले कारवाईमध्ये एकुण ८ आरोपींना अटक करून त्यांचेकडुन एकुण १,६८८ किलो मॅफेड्रॉन (एम.डी.) अंदाजे किंमत ३२७६ कोटी रुपये व इतर साहित्य असा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतला आहे. तसेच गुन्ह्यातील पाहिजे आरोपींचा शोध सुरू असुन गुन्ह्याचा अधिक तपास करणेकरीता देशातील वेगवेगळया शहरांमध्ये पुणे शहर गुन्हे शाखेची पथके रवाना करण्यात आली आहेत.